जा. क्र. ना. बँक/डी-४/पतसंस्था मागणी
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक १८ मे २००२

प्रति,
मा. सचिव, (सहकार)
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२.

## विषय : नागरी सहकारी पतसंस्थांच्या विविध मागण्याबाबत...

महोदय,

महाराष्ट्रातील नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था अधिवेशन दि. २१-४-२००२ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात नागरी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन व नागरी सहकारी पतसंस्थांनी विविध मागण्या सादर त्या मागण्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) **नागरी सहकारी पतसंस्थांनी त्यांच्या सभासदांना दिलेल्या कर्जावर आकारण्यात स्टॅम्प ड्युटीबाबत :** शासनाच्या प्रचलित आदेशानुसार रू. ५,०००/- कर्जाला मर्यादा रू. १५,०००/- पर्यंत वाढविणे आवश्यक आहे व रु. १५,०००/- पुढील स्टॅम्प ड्यूटी माफ करण्यात यावी. पतसंस्थांकडून समाजातील कनिष्ठ व मध्यमवर्गीय लघुउद्योजक हे कर्ज घेत असतात त्यामुळे सदर स्टॅम्प ड्युटी माफ करण्याबाबत वित्त आपराकडून शिफारस करण्यात यावी.

२) **हातातील रोख शिल्लक मर्यादा वाढविण्याबाबत :** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे कलम १०७ तरतुदीनुसार नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था त्याच्या हातात ठेवण्याची मर्यादा रु. ५००/- आहे. सध्याच्या या मर्यादेमुळे पतसंस्थांना कामकाज करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. पतसंस्थांची कामकाजाची वेळ व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कामकाजाची वेळ वेगवेगळी असल्याने हातातील रोख शिल्लक मर्यादेचे पालन संस्थांना प्रत्यक्षात हातात रोख शिल्लक मर्यादा शाखानिहाय रु. ३०,०००/- इतकी करण्याबाबत दुरूस्ती करण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर हातातील रोख शिल्लक रकमेचा विमा उतरविणे सदर संस्थांना बंधनकारक करण्यात यावे.

३) **ठेवी व कर्जावरील व्याजदराबाबत :** नागरी सहकारी पतसंस्थांमधील अनिष्ट स्पर्धेपोटी संस्थेच्या आर्थिक हिताचा विचार न करता बऱ्याच वेळा ठेवी व कर्जाचे व्याजाचे दर संबंधित संस्थांकडून ठरविले जातात. तथापी यामुळे संस्थेचे अर्थकारणच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित संस्थांकडून आकारल्या जाणाऱ्या ठेवीवरील व कर्जावरील

व्याजदराची मर्यादा ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे ठेवीवरील कमाल व्याजदर हा १३% व कर्जावरील कमाल व्याजदर १७% असावा असे वाटते तसेच नवीन नोंदणी होणाऱ्या पतसंस्थांसाठी सदर कमाल व्याजदर १% ने शिथील करण्यात यावा जेणेकरून त्यांना सुरूवातीस काम करताना अडचण येणार नाही. सदर सवलत ही सुरवातीच्या दोन वर्षे देण्यात यावी. या बाबीस शासनाने मान्यता दिल्यास या कार्यालयाचे स्तरावर तसे परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

४) **निधीची गुंतवणूक** : पतसंस्थांनी त्यांचा राखीव निधी व अतिरिक्त निधी व तरलता निधीची गुंतवणूक सध्याच्या ध्येय धोरणानुसार फक्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्येच करण्याची तरतूद आहे. सध्याच्या आर्थिक खुल्या युगामध्ये अशाप्रकारे एकाच बँकेमध्ये गुंतवणूक करण्याचे बंधन असू नये. त्यामुळे सदर रक्कम ही शेड्यूल नागरी सहकारी बँकांत, शासकीय कर्जरोखे इत्यादीमध्ये गुंतवणूक करण्यास हरकत नसावी. कृपया याबाबत शासनस्तरावरून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

५) **सार्वजनिक न्यास/ट्रस्ट यांच्या ठेवी स्विकारणे** : रु. १०.०० कोटीपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या संस्थांना सार्वजनिक न्यास/ट्रस्ट ठेवी स्विकारण्यास हरकत नसावी. याबाबत विधी व न्याय विभागास आपणाकडून शिफारस केल्यास तशा प्रकारची सर्वसाधारण मान्यता विधी व न्याय विभागाकडून आल्यास प्रकरण निहाय अशा प्रस्तावावर निर्णय घेता येईल.

६) **वीजबील दुरूस्ती** : महाराष्ट्रात शहरी भागात पतसंस्थांना वीज बील वसुली केंद्र म्हणून काम करण्यास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून परवानगी दिली जाते. परंतु ग्रामीण भागात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ना हरकत दाखल्याची मागणी केली जाते. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने शहरी व ग्रामीण असा भेद न करता त्यांचे नियम पूर्ण करणाऱ्या संस्थांना मागणीप्रमाणे अशी केंद्रे मंजूर करण्याबाबत शासनस्तरावरून उद्योग व ऊर्जा विभागास करण्यात यावी.

७) नवीन पतसंस्था नोंदणीचे निकष बदलणेबाबत : शासन परिपत्रक दि. २७-३-१९९७ शासनाने ठरवून दिलेल्या निकषात खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | क्षेत्र | सभासद संख्या | भाग भांडवल |
|---|---|---|---|
| अ) | ग्रामपंचायत | ५०० | १ लाख |
| ब) | नगरपालिका | १००० | २ लाख |
| क) | महानगरपालिका | १५०० | ५ लाख |

सध्याचे नोंदणीचे निकष शिथील असल्यामुळे नवीन पतसंस्थांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे त्यांचेवर नियंत्रण ठेवणे जिकीरीचे होत आहे. त्याचप्रमाणे नवीन पतसंस्था लवकरात लवकर अर्थक्षम होणे हे तिच्या सभासदांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे वर सुचविल्याप्रमाणे निकष लागू करण्यात यावेत.

८) **कर्ज मर्यादा** : शासन परिपत्रक दि. १२-७-१९९९ मध्ये शासनाने ठरवून दिलेल्या कर्ज मर्यादा या अत्यंत अपुऱ्या आहेत. सध्या अनेक नागरी सहकारी पतसंस्थांकडे रु. १०० कोटीपेक्षा जास्त ठेवी आहेत तसेच स्वनिधी सुमारे रु. ५ कोटी पर्यंत आहे. त्यामुळे सदर कर्ज मर्यादा ही

स्वनिधीशी निगडीत असावी व नागरी सहकारी बँकांची अशाप्रकारची कमाल कर्ज मर्यादा ही स्वनिधीच्या २०% इतकी आहे. त्यामुळे नागरी सहकारी पतसंस्थांनाही तेच निकष लागू करण्यात यावेत. उदा. ज्या संस्थेकडे रु. ५ कोटीचा स्वनिधी आहे. त्यांच्यासाठी सदर कर्ज मर्यादा रू. १ कोटी असेल तर ज्या संस्थेचा स्वनिधी रु. १० लाख आहे. त्यांचेसाठी सदर कर्ज मर्यादा ही रु. २ लाख असेल.

९) **पाणी बील वसुली केंद्र सुरू करण्यास मान्यता देणेबाबत** : महानगरपालिका तसेच नगरपालिकांची पाणी बिले वसूल करण्यासाठी केंद्र म्हणून स्थानिक अग्रगण्य पतसंस्थेला मान्यता देण्यासाठी शासन पातळीवरून नगर विकास खात्यास विनंती करण्यात यावी.

१०) **टेलिफोन बील वसुली केंद्र म्हणून मान्यता मिळणेबाबत** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ज्याप्रमाणे नागरी सहकारी पतसंस्थांना काही अटीवर वीज बिले स्विकारण्यास परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे टेलिफोन खात्याची टेलिफोन बिले नागरी सहकारी पतसंस्थांनी स्विकारण्यास हरकत नाही यासाठी भारत संचार निगम लिमिटेड यांना विनंती करण्यात यावी.

११) **सहकारी कायदा कलम ७३ब मध्ये सुधारणा करणेबाबत** : सहकारी कायदा कलम ७३ब मधील तरतूदीनुसार दुर्बल घटक वर्गासाठी एक जागा राखीव ठेवण्यात आली आहे. पगारदार पतसंस्थांमध्ये दुर्बल घटक प्रतिनिधी मिळू शकत नसल्याने हे पद रद्द करून त्याऐवजी खुला प्रवर्गातील एक सदस्य संचालक मंडळात घेण्याबाबतची सहकार कायदा दुरूस्ती करण्यात यावी.

१२) **महिला पतसंस्थांमध्ये पुरुष सभासदास जामीनदार ठेवण्याबाबत** : महिला पतसंस्थांमधून कर्ज पुरवठा करताना बऱ्याच वेळी स्थावर मालमत्ता स्त्रिच्या नावावर करून घेतल्यास त्यांचेकडून ठेवी स्विकारता येतील व जामीन राहता येईल. यासाठी या महिला पतसंस्थांमध्ये एकूण महिला सभासदांच्या २०% पुरुष ब वर्ग सभासद म्हणून घेता येतील. तरी याबाबत शासन पातळीवरून मान्यता मिळावी.

१३) **पगारदार पतसंस्थांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाव्यतिरिक्त अन्य बँकांकडून कर्ज घेण्याबाबत** : पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडूनच कर्ज घेण्याची तरतूद आहे. त्याऐवजी सदर पगारदार पतसंस्थांनी प्रकरणनिहाय अन्य वित्तीय संस्था / बँकांकडून कर्ज घेण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक यांना सादर केल्यास प्रकरणनिहाय निर्णय घेता येईल तरी अन्य वित्तीय संस्थांकडून असे कर्ज घेण्याबाबत शासन पातळीवरून मान्यता मिळावी.

सही /-
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे